MHDH040007482022

**<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१४०/२०२२</u>**

छबीलाल दशरथ भिल

–वि–

ग्रामसेवक, ग्रामपंचायत निमगुळ, ता. शिंदखेडा, जि. धुळे

## निशाणी क्र. १ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अनुसार दाखल केलेला आहे. अर्जदार हे मौजे निमगुळ, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथील रहिवासी आहे. मयत धुडकाबाई दाजमल भिल हया अर्जदाराच्या चुलत आजी होत्या व त्या दिनांक ०७.१२.१९८१ रोजी मौजे निमगुळ येथे मयत झालेल्या आहेत. अर्जदाराच्या आजी मयत झाल्यण परंतु अर्जदार व त्यांचे कुटुंबीय यांचेकडुन सामनेवाला यांच्या कार्यालयात अनावधाने त्यांच्या मृत्युची नोंद करुन घेण्याची राहीली आहे.

२. अर्जदार यांना त्यांच्या आजीच्या मृत्युपश्चात शासकीय व निमशासकीय कारणासाठी आजीच्या मृत्युदाखल्याची आवश्यकता भासत असल्याने त्यांनी सदर मृत्यू दाखला मिळणेकामी सामनेवाला यांच्या कार्यालयात चौकशी केली असता अर्जदाराच्या आजीची मृत्यू नोंद आढळून येत नसल्याबाबत सदर कार्यालयाकडून दिनांक ०६.१०.२०२२ रोजी दाखला देण्यात आला. त्यामुळे अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज न्यायालयात केलेला आहे.

३. अर्जदाराच्या आजीच्या मृत्यूबाबत चौकशी करण्यात आली. अर्जदार यांनी स्वतःचे, साक्षीदार दिलीप चैत्राम शिरसाठ व मोतीलाल आप्पा बागल यांचे पुराव्यांचे शपथपत्रे, अर्जदार यांच्या आधार कार्डाची पडताळणी केलेली प्रत आणि अर्जदाराच्या आजीच्या मृत्युची नोंद नसल्याचा सामनेवाला ग्रामपंचायत कार्यालय, निमगुळ यांनी दिलेला दाखला असे कागदपत्रे सादर केलेली आहेत.

४. मृत्यू नोंदणीबाबत सार्वजनिक आक्षेप मागविण्यासाठी दिनांक १४.१०.२०२२ रोजी "दैनीक वार्ता" या वर्तमानपत्रात जाहीर प्रगटन काढण्यात आले. या

जाहीर प्रगटनास ३० दिवसांत अथवा आजपर्यत कोणीही आक्षेप घेतलेला नाही. त्यामुळे प्राप्त तोंडी आणि कागदोपत्री पुराव्याद्वारे अर्जदार यांच्या कथनामध्ये तथ्य दिसून येते. सबब खालील आदेश करण्यात येतो.

**आ दे श**

१. अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. ग्रामसेवक, ग्रामपंचायत, निमगुळ, ता. शिंदखेडा, जि. धुळे यांना सूचित करण्यात येते की, अर्जदाराची चुलत आजी **धुडकाबाई दाजमल भिल** यांचा मृत्यू दिनांक **०७.१२.१९८१** रोजी मौजे निमगुळ, ता. शिंदखेडा, जि.धुळे येथे झाल्याची नोंद जन्म–मृत्यू नोंदणी विभागात योग्य ती कायदेशीर फी घेण्यात येवून अर्जदार यांना त्यांचे आजीचे मृत्यू प्रमाणपत्र देण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by AVINASH WAMANRAO KSHIRSAGAR
Date: 2022.11.30 17:20:28 +0530

दोंडाईचा.
दिनांक – ३०.११.२०२२

( अविनाश डब्ल्यु. क्षिरसागर )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकूरातील शब्द न् शब्द मूळ आदेशाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – | बी. एन. थोरात. |
| न्यायालयाचे नांव | – | दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, दोंडाईचा |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | – | ३०.११.२०२२ |

स्वाक्षरित/–
लघुलेखक.